वन विभागातील वनरक्षक/रोपवन कोतवाल आणि वनपाल/सहाय्यक लागवड अधिकारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेल्या प्रतिमहा रु.१५००/- या कायम प्रवास भत्त्याच्या दरामध्ये रु.१०००/- ची वाढ करुन प्रतिमाह रु.२५००/- या दराने कायम प्रवास भत्ता मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वन विभाग
शासन निर्णय क्र.एफएसटी-०१/२४/प्र.क्र.१०/वने-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०३ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ: महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफएसटी-०१/१४/प्र.क्र.३५/फ-४, दि.२८.०१.२०१६.

प्रस्तावना :-

मनुष्य जीवन आणि वने, वन्यजीव, पर्यावरण व निसर्ग यांचे खूप जवळचे नाते आहे. जीवसृष्टीसाठी आवश्यक शुध्द हवा, ताजे पाणी आणि सकस अन्न या तिन्हीचा आधार वने हाच आहे. सजीव सृष्टीच्या निर्मितीपासून माणसाला याची जाणीव आहे. म्हणूनच वृक्ष, वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरण यांना मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व दिले असून त्याभोवती अनेक बाबी गुंफल्या गेल्या आहेत.

राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २०.१३% एवढे वनक्षेत्र आहे. वन आणि समृध्द अशा नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण, संवर्धन, विकास आणि व्यवस्थापन करण्याकरिता वन विभागांतर्गत क्षेत्रीय आस्थापना कार्यरत आहे. त्याचबरोबर वन विभागातंर्गत सामाजिक वनीकरण संचालनालयामार्फत खाजगी, पडीक आणि सामुहिक जमिनीवर वृक्षरोपणाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम वेळोवेळी घेण्यात आला असून त्याद्वारे हरित महाराष्ट्र संकल्पना प्रत्यक्ष दृष्टीक्षेपात आणण्याचा प्रयत्न या विभागामार्फत झाला आहे. सदर काम पुढील काळात देखील अधिक जोमाने पुढे नेण्याचा विभागाचा मानस आहे.

वन, वन्यजीव, जैवविविधता, पर्यावरण यांचे संरक्षण व संवर्धन आणि वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन वाढविण्यासंदर्भातील जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्यासाठी तळस्तरावर (Ground Level) काम करणारे वनरक्षक / रोपवन कोतवाल आणि वनपाल / सहायक लागवड अधिकारी हे वन विभागांतर्गत आघाडीचे (On front line) कर्मचारी म्हणून संबोधले जातात. या कर्मचाऱ्यांना प्रसंगी २४ तास रात्री-अपरात्री आपले कर्तव्य अतिशय दुर्गम, अतिदुर्गम, डोंगर कड्या-कपाऱ्यात, खोल जंगलात, नक्षलग्रस्त प्रभावित आणि आदिवासी क्षेत्रात बजावावे लागते.

वर नमूद भागात दळणवळणाच्या सुविधा अत्यंत तुटपुंज्या आहेत. त्यासाठी त्यांना महिन्यातून जवळपास २५ दिवस वन आणि वनेतर क्षेत्रात पायी, सायकल किंवा मोटारसायकलने नियमित फिरती करावी लागते. प्रसंगी ही कामे करत असताना काही कर्मचारी/अधिकारी यांना प्राण गमवावा लागला आहे. यावरुन ते करीत असलेले काम अत्यंत जोखमीचे आहे, हे स्पष्ट होते. या कर्मचाऱ्यांना नेमून दिलेले कार्यक्षेत्र एकसंघ (Compact Patch) नसल्यामुळे भौगोलिक क्षेत्राचा विचार करता वनरक्षक व वनपाल यांच्या कार्यक्षेत्राचा परिसर खूप मोठा आहे. गस्तीची/फिरतीची परिमणाकारकता आणि प्रवास भत्याची रक्कम या दोन्ही बाबी निगडीत आहेत.

वरील बाबी विचारात घेऊन, संदर्भाधीन दि.२८.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये वन विभागातील वनरक्षक व वनपाल या संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रतिमाह रु.१,५००/- या दराने ठोक स्वरुपात दरमहा कायम प्रवास भत्ता लागू केलेला आहे.

वन विभागात अभिसरण योजना राबविण्याच्या अनुषंगाने येणाऱ्या संभाव्य अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा., नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. सदरहू अभ्यासगटाने दि.१६.१२.२०२३ रोजीच्या बैठकीतील बाब क्र.८ मध्ये वनरक्षक व वनपाल यांना सद्य:स्थितीत लागू असलेला कायम प्रवास भत्ता लागू करुन बराच कालावधी झालेला असल्याने व दरम्यानच्या काळात महागाईत झालेली वाढ व मानव-वन्यजीव संघर्ष इ. बाबी विचारात घेऊन, वनरक्षक व वनपाल यांच्या कायम प्रवासभत्त्यात वाढ करण्याची शिफारस केली आहे. त्यानुषंगाने वन विभागातील वनरक्षक व वनपाल यांच्या कायम प्रवास भत्त्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वन विभागातील वनरक्षक/रोपवन कोतवाल आणि वनपाल/सहायक लागवड अधिकारी यांना संदर्भाधीन शासन निर्णय दि.२८.०१.२०१६ अन्वये लागू असलेल्या दरमहा रु.१,५००/- इतक्या कायम प्रवास भत्त्यात रु.१,०००/- ची वाढ करुन रु.२,५००/- इतका कायम प्रवास भत्ता करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू कायम प्रवास भत्त्यामधील वाढ ही संदर्भाधीन शासन निर्णय, दि.२८.०१.२०१६ मधील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लागू करण्यात येत आहे.

३. सदरहू शासन निर्णयान्वये वनरक्षक व वनपाल यांच्या कायमप्रवास भत्त्यामध्ये केलेली वाढ ही दि.०१ नोव्हेंबर, २०२६ पासून अनुज्ञेय होईल.

४. यावरील खर्च संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन ज्या लेखाशिर्षांतर्गत काढले जाते त्या लेखाशिर्षातंर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ३८५/व्यय-१०, दि.०३.०८.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०३१६३३०७५३४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SAPKAL PRASHANT PRALHAD

Digitally signed by SAPKAL PRASHANT PRALHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=C2EC242CAEF55E035A2245B60A2752C90753E697F5E56596B3524D34280A891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9548CB33E24729A59B6A5C72EE905604BA53420C8EACFD34E9E8C2460B8AA409, cn=SAPKAL PRASHANT PRALHAD
Date: 2026.11.03 16:33:54 +05'30'

(प्रशांत सपकळ)
कार्यासन अधिकारी,महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.सभापती/उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
३. मा.अध्यक्ष/ उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मंत्री (सर्व)/राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व सन्माननीय सदस्य, विधान परिषद/ विधानसभा.
९. मा.मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
११. महालेखापाल -१ व २ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुबंई/नागपूर
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ मर्या. नागपूर.
१६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
१७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन व संनियंत्रण), सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. मुख्य वनसंरक्षक (सर्व)/वनसंरक्षक (सर्व) / उप वनसंरक्षक (सर्व) / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
२०. निवडनस्ती,वने-४.